सिव्हील ॲपलिकेशन नं. ९१/२०१८, ९२/२०१८
प्रथम अपील (एसटी) क्र. १८९१४/२०१७
(मोटार अपघात दावा क्र.१९७/२०१३)
श्रीमती तुप्ती सचिन पडवणकर व इतर
विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणामध्ये
नुकसान भरपाईची रक्कम जमा
करण्याकरीता मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमटीएस-०४१७/प्र.क्र.१०८/पोल-८
दुसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २७ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-
१) सह पोलीस आयुक्त (प्रशासन),पोलीस आयुक्त बृहन्मुंबई, यांचे पत्र क्र.७४/अ/सहपोआ (प्रशासन)/२०१७, दि.०५.०४.२०१७ चे पत्र.
२) सह पोलीस आयुक्त (प्रशासन),पोलीस आयुक्त बृहन्मुंबई, यांचे पत्र क्र.२२/अ/सहपोआ
३) (प्रशासन)/२०१८, दि.०९.०२.२०१८ चे पत्र.
सह पोलीस आयुक्त (प्रशासन),पोलीस आयुक्त बृहन्मुंबई, यांचे पत्र क्र.पोआ/ क्रक्ष
४) -१४/अर्थसं-१/संजना/न.क्र.४/शा. ३७/१८ दि.२१.०२.२०१८ चे पत्र.
सह पोलीस आयुक्त (प्रशासन),पोलीस आयुक्त बृहन्मुंबई, यांचे पत्र क्र.३०-अ/सहपोआ (प्रशासन)/२०१८, दि.२२.०२.२०१८ चे पत्र.

शासन निर्णय :

श्री. किसन मल्हारी दराडे , पो.ह.क्र. ९५३४ (वाहन चालक), पार्कसाईट-२ ठाणे यांनी विक्रोळी पार्कसाईट-२ ठाणे यांच्या हद्दीत पोलीस वाहन क्र. एम.एच. ०१ बी.ए. ४१२४ - हे वाहन भरधाव वेगाने/निष्काळजीपणे चालवितांना रस्त्यावरील टॅम्पोला व पादचारी यांना दि. ०६.०९.२०१२ रोजी धडक दिली. सदर धडकेने रस्त्यावरील पादचारी श्री. सचिन मोहन पडवणकर यांचा मृत्यू झाला आहे. त्यासंबंधात मृतक श्री. सचिन पडवणकर यांची पत्नी श्रीमती तृप्ती मोहन पडवणकर यांनी मोटार अपघात दावा न्यायाधिकरण , मुंबई येथे मोटार अपघात दावा क्र.१९७/२०१३ दाखल केला होता. त्यानूसार मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाने संबंधिताना नुकसान भरपाईची एकूण रु. २६,७१,०४०/- रक्कम व सदर रक्कमेवर दावा दाखल केल्याच्या दिनांकापासून ८% दराने प्रतीवर्षी व्याजसह अदा करण्याबाबत दि.१९.११.२०१६ रोजी आदेश पारीत केले आहेत.

२. तथापि, सदर आदेशा विरुध्द मा. उच्च न्यायालयात सिव्हील अपील क्र.९१/२०१७ , ९२/२०१७ व प्रथम अपील (एसटी) क्र. १८९१४/२०१७ दाखल केले असता मा. उच्च न्यायालयाने नुकसान भरपाईची रक्कम अनामत म्हणून मा. न्यायाधिकरणामध्ये जमा करण्याबाबत दि. ०१.०२.२०१८ अन्वये आदेशित केले. सदर आदेशाच्याअनुषंगाने **रक्कम रु. ३७,८५,३०८/- (रुपये सदतीस लाख पंच्याशी हजार तीनशे आठ फक्त) इतकी नुकसान भरपाई रक्कम** मा. मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई येथे अनामत म्हणून जमा करण्यास शासन मंजुरी देत आहे.

३. सदर खर्च सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात " मागणी क्र.बी-१, लेखाशिर्ष - २०५५ पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२) (०१) शहर पोलीस आस्थापना, ५० इतर खर्च, (भारित) (अनिवार्य), (२०५५ ००८८) " या लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. याकरीता अपर पोलीस आयुक्त, मोटार परिवहन विभाग, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत असून त्यांच्या कार्यालयातील आंहरण व संवितरण अधिकारी असलेले प्रशासकीय अधिकारी, मोटार परिवहन विभाग, मुंबई यांनी सदर रक्कम आंहरित करुन मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई येथे अनामत रक्कम म्हणून जमा करावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभाग, वित्तिय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग चार मधील अनुक्रमांक ५ अनुसार व शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.६८/अर्थसंकल्प-३, दि. ०१.०४.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.mharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२७१७२५०४४९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल साक्षांकित करुन काढएयात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhakar D. Pawar

Digitally signed by Sudhakar D. Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2c1ebd27661971090dc2c91d4bb9caabd4da394aa85829a09265097faf097ba5, cn=Sudhakar D. Pawar
Date: 2018.02.27 17:25:57 +05'30'

(सु. धो. पवार)
अवर सचिव, गृह विभाग

प्रति,

१. पोलीस आयुक्त ,बृहन्मुंबई
२. महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), मुंबई.
३. सह पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, बृहन्मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. निवडनस्ती (पोल-८)